महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ५८/प्रनिप्रा/५८३ दिनांक : 20 JUL 2021

**बैठकीचे इतिवृत्त**

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक २८ जुन, २०२१ रोजी सकाळी ११:०० व दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ३२व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. .... सचिव

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ६) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. युवराज मलघे, सहसंचालक ,उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

16/7/21
(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: खालील तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | विभाग | | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १) | उच्च शिक्षण | सकाळी ११:०० वा. | एम.एड. |
| | | दुपारी ०३:०० वा. | एम.पी.एड. |

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांनी क्रमांक बीएड-३७२१/प्र.क्र.४९/सीईटीसेल/७१३६, दिनांक २२/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसाथिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेबाबतचे अहवाल कोविड-१९ च्या पार्दुभावामुळे सादर करणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींचे अवलोकन केले असता, संबंधीत संचालकांनी प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून संबंधीत महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मंजुरीच्या प्रस्तावास अनुसरुन संचालनालयाने किती दिवसांत प्रवेश प्रमाणित करुन अहवाल सादर करावा, याबाबत कोणतेही निर्देश नाहीत, सबब वरील बाबी विचारात घेता सांगोपांग चर्चा करुन प्रवेश नियामक प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक एम.एड., एम.पी.एड.व अन्य अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांना सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये संबंधीत महाविद्यालयांनी उक्त नमूद अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रक्रिया केली नसल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी या अनुषंगाने संबधीतांवर अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २० अन्वये कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे व तद्नुषंगाने दिनांक २५/०५/२०२१ रोजी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधीत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

तथापि, संचालनालय उच्च शिक्षण, पुणे यांनी याबाबत खालील प्रमाणे अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

अ) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.

ब) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव उशिरा सादर केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.

क) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस च्या अनुषंगाने स्मरणपत्र निर्गमित करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करावी.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक एम.एड. व एम.पी.एड. अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली.

४) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक एम.एड. व एम.पी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पडताळणी झालेली नसल्याने सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एम.एड. व एम.पी.एड.अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी/छाननी प्रक्रिया संचालनालय स्तरावर लवकर करण्यात येईल, असे डॉ. युवराज मलघे, सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले, या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक १५ जुलै २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

विषय क्रमांक २ : **मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

वरीलप्रमाणे विषय/अभ्यासक्रमनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 16/7/21